राज्य माहिती आयोग, पुणे विभाग, पुणे

क्र.रामाआ/अपील/पुणे/०४/२००८
राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
फोन क्र. २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दिनांक : २ /०५/२००८.

प्रति,

श्री.रविंद्र महादेव देसाई
३/२२, लक्ष्मी नगर पर्वती,
पुणे ४११ ००९.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५-कलम १९ (३) अन्वये अपील

संदर्भ : आपले व्दितीय अपील दि.७/४/२००६.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपण राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे संदर्भाधीन अपील दाखल केले आहे.

आपण दि. १६/६/२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र.५१५/पुणे सुनावणी यापूर्वीच झाली असून सदर सुनावणीचे आदेश आपणास या कार्यालयाच्या दि.१२/३/२००८ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहेत. सदर अपील क्र ५१५/पुणे, प्रमाणेच उपरोक्त नमूद संदर्भाधीन दि.७/४/२००६ चे अपील निकाली काढण्यात येत असल्याचे मला आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

(य.ह.देशपांडे)
कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग
पुणे विभाग, पुणे

प्रत : जन माहिती अधिकारी, शिक्षण प्रसारक मंडळी, शारदा सभागृह , पुणे ३०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. जयंतकुमार शिवमूर्ती पाठक
कोणार्क कोर्ट, डेक्कन कॉलेज रोड,
सादल बाबा जवळ, येरवडा, पुणे-४११००६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वनसरंक्षक (वन्यजीव), पुणे — उत्तरवादी
स.नं.४९, वानवडी, फॉरेस्ट कॉलनी,
साळुंखे विहारजवळ, पुणे-४११ ०२२

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक वनसरंक्षक,
मा.प.अ.स्थित, वानवडी, फॉरेस्ट कॉलनी,
साळुंखे विहारजवळ, पुणे-४११ ०२२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. जयंतकुमार शिवमूर्ती पाठक,
कोणार्क कोर्ट, डेक्कन कॉलेज रोड,
सादल बाबा जवळ, येरवडा, पुणे-४११००६

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक वनसरंक्षक, मा.प.अ.स्थित,
वानवडी, फॉरेस्ट कॉलनी, साळुंखे विहारजवळ, पुणे-४११ ०२२
श्री. सी. एल. धुमाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. १.१.२००५ ते दि. १३.१.२००५ या कालावधीची हक्काची रजा मंजूर असतानाही सदर कालावधीचे अद्यापपर्यंत वेतन न देण्याचे कारण काय, व या विलंबास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर काय कारवाई करणेत आली.

## विवेचन

हक्काची रजा मंजूर असताना त्या कालावधीचे वेतन मिळण्यासंबंधी अपीलकर्ता श्री.जयंतकुमार शिवमूर्ती पाठक यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, पुणे यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला होता. जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने श्री.पाठक यांनी अपिलीय प्राधिकारी तथा वनसंरक्षक, वन्यजीव; पुणे यांच्याकडे अपील केले. वेतन मंजुरीच्या संदर्भातील तपशील नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचे अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.पाठक यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

हक्काची रजा मंजूर असतानाही वेतन का मिळाले नाही व ते त्वरित द्यावे, हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी त्याबाबतचा तपशील श्री.पाठक यांना दिला. दरम्यानच्या काळात श्री.पाठक यांनी महाराष्ट्र प्रशासकीय लवाद, मुंबई खंडपीठ याच्याकडे अर्ज दाखल केला. तेथे श्री.पाठक यांच्या बाजूने निर्णय लागून संबंधित वेतन व भत्ते १५ दिवसांच्या आत अदा करण्यासंबंधी आदेश देण्यात आले. या आदेशानुसार संबंधित कालावधीचे वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असे वनसंरक्षक, वन्यजीव, पुणे यानी आयोगाला सादर केलेल्या लेखी व तोंडी निवेदनात नमूद केले.

प्रशासकीय विषयाची प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे माहितीच्या अधिकाराखाली या विषयाची दखल घेण्याची आवश्यकता नाही.

## आदेश

विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. ६.५.२००८**

क्र.३९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकर अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले दाखल**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.शिवगोंडा बाबुराव आवटे
मु.पो.पट्टणकोडोली, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, पट्टणकोडोली शेतकरी विकास सेवा संस्था, मर्यादित, पट्टणकोडोली, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ९०३ (३९) / कोल्हापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १३.५.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवगोंडा बाबुराव आवटे
मु.पो.पट्टणकोडोली, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, पट्टणकोडोली शेतकरी विकास
सेवा संस्था, मर्यादित, पट्टणकोडोली, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४. | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि. १०.४.२००६ |
| ५. | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि. १५.५.२००६ |
| ६. | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि.७.६.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ७. | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.२१.७.२००६ |

८. <u>मूळ मागणीचा तपशील</u>

सन १९९९-२००६ पर्यंतची पट्टणकोडोली शेतकरी विकास सेवा संस्था मर्यादित या संस्थेच्या कामकाज व आर्थिक व्यवहाराबाबतची माहिती

## विवेचन

सदर अपिलाची सुनावणी दिनांक १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता, अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी यावेळी उपस्थित होते. सहकार संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यंचे म्हणणे आहे. मात्र खात्याच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कागदपत्रांचे अवलोकन करु द्यावे, तसेच हव्या त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना सशुल्क द्याव्यात असे आयोगापुढील सुनावणीत ठरले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कागदपत्रांचे अवलोकन करु द्यावे व हव्या त्या कागदपत्रांच्या प्रती १५ दिवसात अपीलकर्ता यांना सशुल्क द्याव्यात.

कोल्हापूर
दि.१६.५.२००८

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेंद्र दत्तात्रय कांबळे
मु. पो. यवत, ता. दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यामिक),
जिल्हा परिषद, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
जिल्हा विद्या विकास मंडळ, पुणे
२३१, गुरुवार पेठ, पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. राजेंद्र दत्तात्रय कांबळे,
मु. पो. यवत, ता. दौंड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यामिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब

**जन माहिती अधिकारी तथा** अध्यक्ष, जिल्हा विद्या विकास मंडळ, पुणे
२३१, गुरुवार पेठ, पुणे-२ श्री. व्ही. एस. दरेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

जिल्हा विद्या विकास मंडळ, पुणे या संस्थेने कर्मचारी नेमणुका, बढती, पदोन्नती, बदली यासाठी कोणत्या शासकीय जी.आर. अन्वये निर्णय घेतला त्याच्या प्रती

## विवेचन

आपल्या बदलीबाबत व बढतीबाबत, तसेच कनिष्ठ लिपीक श्री.व्ही.एस.संकपाळ यांच्या पदोन्नतीनंतर रिक्त झालेले पद न भरण्याबाबत अपीलकर्ता श्री.राजेंद्र दत्तात्रय कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा विद्या विकास मंडळ, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना १००/- रु. शुल्क भरण्यास कळविले, परंतु श्री.कांबळे यानी शुल्क भरले नाही व शुल्क शासकीय कोषागारात भरण्यास न सांगता मुख्याध्यापक, विद्या विकास मंदिर, यवत यांच्याकडे कोणत्या नियमानुसार भरण्यास सांगितले त्याची प्रत पाठवावी, अशी मागणी केली. त्यावर संस्थेने उत्तर दिले नाही. त्यांनतर श्री.कांबळे यानी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु संबंधित विषयाबाबत धर्मादाय आयुक्त, न्यास नोंदणी कार्यालय, पुणे हे अपिलीय प्राधिकारी असल्याचे शिक्षणाधिकारी यानी कळविले. श्री.कांबळे यांनी केलेल्या अपिलावर सुनावणी घेऊन धर्मादाय आयुक्तांनी श्री.कांबळे याना माहिती देण्याचा आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिला. त्यानुसार आवश्यक त्या नियमावलीच्या प्रती नोंदणीकृत टपालाने जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.कांबळे यांना पाठविल्या. मात्र दरम्यानच्या काळात श्री.कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. धर्मादाय आयुक्तांच्या निर्णयानंतर नियमावलीच्या प्रती व निकालपत्राची प्रत दि.२८.११.२००६ रोजी नोंदणीकृत टपालाने पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा मानद सचिव श्री.व्ही.एस.दरेकर

यानी आयोगापुढील सुनावणीत तोंडी व लेखी नमूद केले. श्री.कांबळे यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलात कर्मचारी नेमणूक, बढती, बदली यासाठी कोणत्या शासन निर्णयाद्वारे कृती केली त्याच्या प्रती मिळाल्या नसल्याचे नमूद केले होते. परंतु याबाबत स्वतंत्र शासन निर्णय नाही, पण नियमावली आहे व त्याची प्रत श्री.कांबळे यांना देण्यात आली आहे, असे श्री.दरेकर यांनी नमूद केले. सदर माहिती आपल्याला मिळाली असल्याचे श्री.कांबळे यानी सांगितले.

वरील परिस्थिती लक्षात घेता श्री.कांबळे यांना आवश्यक ती माहिती शुल्क न भरताही देण्यात आली आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ६.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११० / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | डॉ. श्री. रामचंद्र बळवंत मगदूम<br>मु.पो. चिखली, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत )<br>पंचायत समिती, कागल ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, कागल ता. कागल, जि. कोल्हापूर |

५ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

ग्रामपंचायत चिखली ता. कागल यांचेकडील एप्रिल २०००, एप्रिल २००२, एप्रिल २००४, १५ जून २००५ ते १५ जून २००६ च्या थकबाकीदारांची यादी, नावे, पत्ते, थकबाकीची रक्कम, कालावधी, वसुलीसाठी केलेली कारवाई, कारवाईचा परिणाम

चुकीची माहिती दिली आहे, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. माहिती वेळेत व तपासून दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीची शहानिशा करण्यासाठी कागदपत्रांचे अवलोकन नि:शुल्क करू द्यावे. थकबाकीची न दिलेली माहिती नि:शुल्क द्यावी व पूर्तता अहवाल आयोगास आठ दिवसांत सादर करावा.

**पुणे**
**दि. २८.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

3114 · पृ 111



**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. मारूती कृष्णा संकपाळ<br>मु.पो. चिखली, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत)<br>पंचायत समिती, कागल ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, कागल ता. कागल, जि. कोल्हापूर |

५ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

मौजे चिखली येथील गाव तलावाचे प्रदूषण नियंत्रणासाठी करणेत आलेली कारवाई, गाव तलावाचे काठावर बांधलेल्या शौचालयाला, बांधकामास परवानगी मंजूर करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या नकला, शौचालये बेकायदेशीर बांधली असल्यास ग्रामपंचायतीने केलेली कायदेशीर कारवाई व फलनिष्पत्ती, तलावातील मासे विक्रीच्या लिलावातून मिळालेल्या उत्पन्नाची वर्षवार माहिती, तलावाचे दुरूस्तीसाठी केलेला खर्च, फंडाचे नाव, कंत्राटदाराचे नाव, वर्ष

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास अपेक्षित असलेली माहिती पंधरा दिवसात देण्याचे ठरले. दि. १०.७.२००६ च्या मूळ अर्जावरील प्रथम अपिलाची सुनावणी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, कागल यांनी

दि. ११.४.२००८ रोजी घेतली. या विलंबाबाबत अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, कागल श्री. इसरार वाय. पठाण यांना कडक समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. चर्चेत ठरल्याप्रमाणे अपीलकर्त्यास अपेक्षित असलेली माहिती पंधरा दिवसात उपलब्ध करून दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास दि. ५.६.२००८ पर्यंत सादर करावा.

पुणे
दि. २६ .५.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:११३ /सातारा /२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.विष्णू किसन पाटील<br>फा.प्लॉट नं.२०५, मंगळवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे<br>यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा<br>उपसंचालक, भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे<br>यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे |

निरीक्षक भूमी अभिलेख, कराड यांनी दि.६.६.२००६ रोजी घेतलेल्या नोंदी सदोष असल्याने त्या दुरुस्त नोंदी घेणेबाबतची मागणी अपिलकर्त्यांनी केली आहे. परंतु सदर विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ५.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रकाश शंकर कुंभार<br>५२९, कुंभारगल्ली, कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, कागल नगरपरिषद, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग) पुणे विभाग, पुणे |

अपीलकर्त्यास माहिती मिळाली असून तक्रार नसल्याचे वरील तीनही घटकांमधील चर्चेत अपीलकर्त्याने नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २५.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. शिवाजी यशवंत घराळ<br>मु.पो. कासेगाव, ता. वाळवा, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, भूतलक्षी प्रभावाने वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) पदावर पदोन्नती इत्यादी नऊ मुद्दयांबाबत माहितीची अपीलकर्त्याची मागणी आहे. ती दि. ७.५.२००८ रोजी प्राप्त झाली असून जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावू नये व अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले.

सबब आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. शंकर रंगराव लोखंडे<br>रा. रविवार पेठ (पुर्व) माधवनगर, ता. मिरज, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हजर होते. वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, माहिती दिलेली आहे, मात्र अपीलकर्त्याची मागणी थकित वेतन मिळण्याबाबत होती, असे दिसून येते. त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यानी लेखी नमूद केले. मात्र सदरची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भास्कर का.गायकवाड
बी/६, ओबीसी एम्प्लॉईज सह.हौसिंग सोसायटी,
पवनानगर, चिंचवडगाव, पुणे-३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र
महाविद्यालय, कराड, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय औषधनिर्माणशास्त्र
महाविद्यालय, कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२० / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भास्कर का.गायकवाड
बी/६, ओबीसी एम्प्लॉईज सह.हौसिंग सोसायटी,
पवनानगर, चिंचवडगाव, पुणे-३३

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र
महाविद्यालय, कराड, जि.सातारा डॉ.सतीश बाळकृष्ण भिसे

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय औषधनिर्माणशास्त्र
महाविद्यालय, कराड, जि.सातारा डॉ.अधिकराव व्यंकटराव यादव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.७.३००६ |

| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>श्री.सुनील पवार, रोजंदारी चालक यांनी केलेल्या जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी चौकशी करण्यात आली, त्यात श्री.पवार यांच्याविरुध्द काय कारवाई केली. या चौकशीतील साक्षीदार श्री.घुटूकडे व श्री.गोंजारी यांनी दिलेल्या लेखी साक्षी निवेदनांच्या सत्यप्रती मिळाव्यात. चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालाची सत्यप्रत मिळावी. चौकशी अहवाल प्राप्त होऊनही संबधितांविरुध्द कारवाई का करण्यात आली नाही. |
|---|---|

## विवेचन

मागितलेली माहिती देण्यास २०४ दिवस विलंब झाल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावावी, या मागणीसाठी अपीलकर्ता श्री.भास्कर का.गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.भास्कर गायकवाड (भांडारपाल) यांना रोजंदारी चालक श्री.सुनील पवार यांनी कथित शिवीगाळ केल्याच्या प्रकरणाबबात माहिती मागितली होती. ती देण्यास २०४ दिवस विलंब झाला, असे श्री.गायकवाड यांचे म्हणणे आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यानी आपल्या अपिलाची योग्य ती दखल घेतली नाही, असेही श्री.गायकवाड यांनी नमूद केले आहे. याच मागणीसाठी श्री.गायकवाड यांनी यापूर्वी केलेल्या अपिलाचा निर्णय राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी दि.३०.५.२००६ रोजी दिला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे माहिती देता येते की नाही याबाबत साशंकता होती. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या आदेशानंतर योग्य ते शुल्क ( रु.४/-) कळवून माहिती दिली, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड, जि. सातारा डॉ.सतीश बाळकृष्ण भिसे यानी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. रोजंदारी चालक श्री.सुनील पवार यानी श्री.गायकवाड याना जातीवाचक शिवीगाळ केल्याची श्री.गायकवाड यांची तक्रार आहे. त्याबाबतच्या साक्षीदारांच्या निवेदनाच्या सत्यप्रती व चौकशी अहवालाची सत्यप्रत श्री.गायकवाड याना द्यावी, असा आदेश मुख्य राज्य माहिती आयुक्त, डॉ.सुरेश जोशी यांनी दिला होता. त्यानुसार माहिती दिली असल्याचे व विलंबाबाबत शास्तीच्या मागणीबाबत राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी कोणताही आदेश दिला नसल्याचे डॉ.भिसे

यांनी नमूद केले. मात्र प्रतीपृष्ठ ७५ पैसे प्रमाणे ४ रुपये शुल्क आकारले आहे. माहिती नि:शुल्क देणे आवश्यक होते, असे प्रतिपादन श्री.गायकवाड यांनी केले.

याच विषयाचा निर्णय राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी पूर्वीच दिलेला आहे. या स्थितीत मागणीचा पुर्नविचार करण्याची आवश्यकता नाही. मात्र माहिती नि:शुल्क देणे आवश्यक होते. हे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) माहितीसाठी आकारलेले शुल्क रुपये ४/- जन माहिती अधिकाऱ्यांनी व्यक्तिश: श्री.गायकवाड यांना परत करावे, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला त्वरित सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ६.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नंदकुमार दादासाहेब अवघडे,
रा. राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१,
खोली नं.१२८/२, 'बी' एरिया, रामटेकडी,
पुणे-४११ ०२२ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा समादेशक सहाय्यक
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नंदकुमार दादासाहेब अवघडे,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१,
खोली नं.१२८/२, 'बी' एरिया, रामटेकडी, पुणे-४११ ०२२

**जन माहिती अधिकारी** तथा समादेशक सहाय्यक, राज्य राखीव पोलीस बल,
गट क्र.१, पुणे श्री. निवृत्ती वसंत बनसोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक बाबीसाठी बँकेचे कर्ज घेण्यासाठी कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते, त्या संदर्भात कार्यालयाच्या पटलावरील माहिती. समादेशक यांचे कार्यालयीन जा.क्र. प्रलि/लेखा-२/एनडीए/२००६/१०२२ दि. १.२.२००६ या जावक क्रमांकाने मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त, पुणे यांना देण्यात आलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत

## विवेचन

पोलीस कर्मचाऱ्यांना घरबांधणीसाठी कर्ज मिळण्यासाठी राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१, पुणे येथील तत्कालीन समादेशक सहाय्यक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१, पुणे श्री.बी.एस.थोरात यांनी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.नंदकुमार दादासाहेब अवघडे (भोसले) यांनी जन माहिती अधिकारी तथा समादेशक सहाय्यक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१, पुणे यांच्याकडे मागितली होती. त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(१)(ड.)(ज्ञ) अन्वये माहिती नाकारली, त्याविरुध्द श्री.अवघडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१, पुणे यांच्याकडे अपील केले. 'आपण मागितलेल्या माहितीबाबत राज्य मुख्य माहिती आयुक्त, पुणे यांना लिखाण करण्यात आलेले असून त्यांच्याकडून कळविल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल', असे तत्कालीन

समादेशक श्री.भुजंगराव शिंदे यांनी श्री.अवघडे यांना कळविले. त्याविरुध्द श्री.अवघडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

घराकरिता आपल्या दलाच्या गटातील अनेकांनी अर्ज केले होते. काही बँकांनी कर्मचाऱ्यांचे अर्ज नामंजूर केले, हे माहीत असतानाही श्री.थोरात यांनी या कर्मचाऱ्यांना इतर बँकांकडील कर्जाच्या मागणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र काही रक्कम घेऊन दिले. आपल्याला मात्र पूर्वग्रहदूषित बुध्दीने तसे प्रमाणपत्र दिले नाही, त्यामुळे आपले नुकसान झाले, असा श्री.अवघडे यांचा आरोप आहे. 'श्री.थोरात यांनी घराच्या रकमेबाबत काही रक्कम खंडणीदाखल स्वीकारण्याचे कबूल केल्यावर पुन्हा नाहरकत प्रमाणपत्रे दिली आहेत', असे श्री.अवघडे यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. राज्य मुख्य माहिती आयुक्त, पुणे असे कोणतेही पद त्यावेळी ( दि.१.२.२००६) अस्तित्वात नसताना त्यांच्याकडे पत्रव्यवहार केल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी चुकीचे कळविले, असे श्री.अवघडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.थोरात दि.२८.२.२००७ राजी निवृत्त झाले आहेत. आपल्या पत्नीच्या आजारपणामुळे आपण सुनावणीला उपस्थित राहू शकत नसल्याचे त्यांनी कळविले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.भुजंगराव शिंदे यानी दि.१३.१०.२००७ च्या निवेदनाद्वारे लेखी म्हणणे सादर केले. नंतर समक्ष उपस्थित राहून निवेदन केले.

तत्कालीन संदर्भ असल्यामुळे आपल्याला संबंधित विषयाबाबत अधिक माहिती नाही, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा समादेशक सहाय्यक श्री.बनसोडे यांनी सांगितले.

राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ या कार्यालयातून जानेवारी २००१ ते डिसेंबर २००५ या कालावधीत बँकेतून कर्ज घेण्यासाठी कोणताही ना हरकत दाखला दिला गेला नाही, हे अपिलाच्या वेळीही श्री.अवघडे यांना स्पष्ट केले होते, असे श्री.भुजंगराव शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.अवघडे यांना गैरकृत्याबद्दल दि.१०.४.२००६ रोजी सेवेतून कमी करण्यात आले असल्याचेही श्री.भुजंगराव शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले आहे. मात्र ना हरकत प्रमाणपत्राच्या संदर्भात

श्री.थोरात यांच्याविरुध्द चौकशी चालू असल्याचे श्री.अवघडे यांनी निदर्शनास आणले. श्री.बनसोडे यांनी त्याला दुजोरा दिला.

श्री.अवघडे यांनी श्री.थोरात यांच्यावर केलेले लेखी व तोंडी आरोप हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. मात्र त्यांनी मागितलेली माहिती त्याना मिळणे आवश्यक होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेता पुढील बाबी स्पष्ट होतात:

(१) श्री.अवघडे यांनी श्री.बी.एस.थोरात यांच्या संदर्भातील माहिती मागितली तेव्हा स्वतः श्री.थोरात हेच जन माहिती अधिकारी होते. श्री.अवघडे यांनी मागितलेली माहिती कलम ८ अन्वये नाकारण्याचा त्यांचा निर्णय योग्य नव्हता.

(२) श्री.थोरात यांनी काही कर्मचाऱ्यांना बँकेच्या कर्जासाठी ना हरकत प्रमाणपत्रे दिली की नाही, याबाबत उभय बाजूंमध्ये मतभेद आहेत. अशी प्रमाणपत्रे दिली असल्याचे श्री.अवघडे यांचे म्हणणे आहे, तर तशी प्रमाणपत्रे दिलेली नाहीत, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. अशी प्रमाणपत्रे दिली असल्याचा कोणताही ठोस पुरावा श्री.अवघडे यांनी सादर केलेला नाही.

(३) श्री.अवघडे यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर विविध प्रकारचे आरोप केले आहेत. परंतु पूरक कागदपत्रांअभावी अशा आरोपांची दखल माहितीच्या अनुषंगाने घेता येणार नाही.

(४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, पुणे असे पद अस्तित्वात नाही. तसेच माहिती आयोगाला लेखन केल्याची सबब अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कळविणे योग्य नाही.

श्री.थोरात यांच्याबाबतच्या चौकशीच्या संदर्भातील सद्यःस्थितीची माहिती, तसेच ना हरकत प्रमाणपत्रांच्या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.थोरात व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.भुजंगराव शिंदे यांची निवेदने सुनावणीपासून सात दिवसात सादर करण्याचा आदेश आयोगाने श्री.बनसोडे यांना दिला होता. श्री.भुजंगराव शिंदे यांनी समक्ष उपस्थित राहून व लेखी

स्वरुपात निवेदन सादर केले. श्री.थोरात यांचे निवेदन व त्यांच्या चौकशीच्या संदर्भातील सद्य:स्थितीबाबतची माहिती अद्याप सादर झालेली नाही, याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) श्री.बी.एस.थोरात यांच्या संदर्भातील चौकशीबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल व त्यांचे लेखी निवेदन हा आदेश मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत आयोगाला सादर करावे. त्याची प्रत त्यानी अपीलकर्त्यासही पाठवावी. जन माहिती अधिकारी तथा समादेशक सहाय्यक श्री.निवृत्ती बनसोडे यांची ही जबाबदारी राहील. संबंधित निवेदने मुदतीत सादर करण्यात दिरंगाई केल्याबाबत श्री.बनसोडे यांना समज देण्यात येत आहे, व ही कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण न झाल्यास ते कारवाईस पात्र राहतील, याची जाणीव देण्यात येत आहे.

(३) श्री.बी.एस.थोरात यांनी वरील मुदतीत आपले म्हणणे सादर न केल्यास ते कारवाईस पात्र राहतील, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.५.२००८